# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**

दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७

ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

ई-मेलद्वारे
**टपालाद्वारे**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/नाहपतक्रार/पुवि/१७/
**दिनांक :- २३.०६.२०१७.**

प्रति,

**अध्यक्ष/सचिव,**
**आंबेगांव तालुका विद्या विकास मंडळ, घोडेगांव**
**ता.आंबेगांव जि. पुणे**

**विषयः-** विना परवानगी/ शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र न घेता जाहिरात प्रसिध्दीबाबत

**संदर्भ : श्री. सुदाम भिकाजी ढोके, यांचा तक्रारी अर्ज दि.२३.०६.२०१७**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात दिनांक २१.०६.२०१७ रोजी अनुदानित/ विना अनुदानित शिक्षक भरती बाबत आपण जाहिरात प्रसिध्द् केलेली आहे, शासन निर्णय दि. ०२ मे २०१२ मधील तरतुदीनुसार आणि शासन निर्णय दि. २०.६.२०१४ व शासन शुध्दीपत्रक दि.०४.०६.२०१६ मधील तरतुदीनुसार नवीन शिक्षक भरती प्रक्रियेसाठी मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांच्या अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठित करण्यात आलेली आहे, सदर समितीचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्या खेरीज कोणत्याही प्रकारचे शिक्षक भरतीची दिलेली जाहिरात ही अनाधिकृत समजण्यात येईल.

आपण दिलेल्या जाहिरातीबाबत मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या समितीकडुन जाहिरात देणेबाबत नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले दिसुन येत नाही. त्यामुळे दि. २१.०६.२०१७ च्या जाहिरातीनुसार घेण्यात येणा-या उमेदवारांच्या मुलाखती या बेकायदेशिर असल्यामुळे सदरच्या मुलाखती तात्काळ रद्द करावयात त्याचप्रमाणे भरती प्रक्रिया थांबाववी. आपण नाहरकत प्रमाणपत्र नसतांना भरती प्रक्रिया केल्यास संबधित शिक्षकांच्या या कार्यालयाकडून वैयक्तिक मान्यता दिल्या जाणार नाहीत, त्यामुळे वेतनाची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी**

१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा पुणे